नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | अंक - २८९ | वार शुक्रवार दि. ७ मार्च २०२५ | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 2nd | Issue - 289 | Blow- Friday Date 7 March 2025 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## थोडक्यात...

### ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ सुरूच राहणार : मंत्री आदिती तटकरे

**मुंबई :** ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ पुढच्या कालावधीमध्येही यशस्वीरित्या राबवण्याचे आणि चालू ठेवण्याची शासनाची भूमिका आहे. पात्र लाभार्थी महिलांवर अन्याय होऊ देणार नाही, लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा हप्ता देण्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना दिली. चर्चेदरम्यान मंत्री तटकरे म्हणाल्या की, अंगणवाडी इमारतींच्या दुरुस्तीसाठी लागणारा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. अनाथ बालकांच्या पुनर्वसनाबाबत प्रक्रिया सुरळीत करण्याच्या दृष्टिकोनातून नियमानुसार उपाययोजना करण्यात येतील. गर्भाशय मुखाच्या कर्करोग लसीकरणाबाबत आरोग्य विभागासोबत समन्वय साधून उपयुक्त असा उपक्रम पुढच्या कालावधीमध्ये निश्चितपणाने शासन राबविणार आहे. कुपोषणाचे प्रमाण जास्त असलेल्या ११ जिल्ह्यात विविध उपयोजना राबविण्यात येत आहेत. कुपोषण आणि निमियाचे प्रमाण कमी करण्यासाठी या भागांमध्ये विशेष उपक्रम राबविण्यात येईल. मागणीनुसार व आवश्यकतेप्रमाणे राज्यात स्मार्ट अंगणवाड्यांची निर्मिती करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

## मुंबई, महाराष्ट्राची व शासनाची भाषा मराठीच : मुख्यमंत्री फडणवीस

### विरोधक ‘संघ’टित; मराठीवरून संघनेते भय्याजी जोशी यांच्या विधानाने सरकारची कोंडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ‘मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकली पाहिजे असे नाही’, ‘घाटकोपरची भाषा गुजराती’ अशी वादग्रस्त विधाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह सुरेश ऊर्फ भय्याजी जोशी यांनी केली. यामुळे विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधकांना आयतेच बळ मिळाले. धनंजय मुंडे यांचा मंत्रीपदाचा राजीनामा, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे तसेच योगेश कदम या मंत्र्यांवर विरोधकांनी आरोप केले असतानाच आता या मुद्द्याने सरकारची कोंडी झाली.

मराठीच्या मुद्दयांवरून महाविकास आघाडीने भाजपला लक्ष्य केले. मुंबईचे मराठीपण हद्दपार करण्याचा संघ आणि भाजपचा डाव असल्याचा आरोप विरोधकांनी केला. जोशी यांच्या वक्तव्यावर चौफेर टीका झाल्यानंतर मुंबई, महाराष्ट्राची व शासनाची भाषा मराठीच असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत द्यावी लागली. वाद वाढल्याने ‘मुंबई व महाराष्ट्राची भाषा मराठीच असून प्रत्येकाने मराठी भाषा शिकली पाहिजे, ’ अशी सारवासारव जोशी यांना करावी लागली.विधिमंडळात पडसाद

घाटकोपर येथे एका कार्यक्रमात बोलताना भय्याजी जोशी यांनी मुंबईच्या विविधतेतील एकतेवर भाष्य केले होते. ‘मुंबईत विविध राज्य, प्रांत आणि भाषा बोलणारे नागरिक राहतात. येथे अनेक भाषा आहेत आणि घाटकोपरची भाषा गुजराती आहे, गिरगावची भाषा हिंदी आहे. त्यामुळे मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषा शिकली पाहिजे, असे नाही,’ असे वक्तव्य त्यांनी केले होते. त्याचे पडसाद विधिमंडळात उमटले.

विधानसभेत शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) गटनेते भास्कर जाधव यांनी हा मुद्दा उपस्थित केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून सरकारने गौरव केला. त्याच वेळी भय्याजी जोशी हे मराठीच्या विरोधात मुंबईत येऊन विधाने करतात. त्यावर मुख्यमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी जाधव यांनी केली. मुंबई, महाराष्ट्राची व शासनाची भाषा मराठीच आहे, महाराष्ट्रात राहणाऱ्याने प्रत्येकाने मराठी भाषा शिकली पाहिजे आणि बोलली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका फडणवीस यांनी मांडली. राज्यात अन्य भाषांचाही सन्मान आहे. आम्ही कोणत्याही भाषेचा अपमान करणार नाही. जो स्वत:च्या भाषेवर प्रेम करतो तोच अन्य भाषांवर प्रेम करतो, अशी पुष्टीही फडणवीस यांनी जोडली.



भय्याजी जोशी यांच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. नाहीतर, हा भाजप आणि संघाचा छुपा कार्यक्रम (अजेंडा) आहे, हे मान्य करावे, अशी टीका त्यांनी केली. मुंबईत आता मराठी बोलणेही कठीण झाल्याची टीका राष्ट्रवादीचे गटनेते जितेंद्र आव्हाड यांनी केली.नवा संघर्ष पेटविण्याचा संघाचा डाव - राज ठाकरे

मुंबईत राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी येणे गरजेचे नाही, असे विधान राजकीय हेतूने केले असून, असल्या काड्या घालून राज्यात नवा संघर्ष निर्माण करण्याचा संघाचा डाव असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी केला. मुंबईत कोणती भाषा चालते आणि ही मुंबई कोणाची आहे हे जगाला समजते तर जोशी बुवांना कसे समजत नाही असा टोलाही त्यांनी लगावला. भारतीय जनता पक्ष महाराष्ट्राच्या अस्मितेला प्राधान्य देऊन जोशी यांचा निषेध करणार का असा सवालही त्यांनी केला.

वादानंतर भय्याजींनी सारवासारव करीत मुंबई व महाराष्ट्राची भाषा मराठीच आहे व प्रत्येकाला मराठी भाषा शिकलीच पाहिजे, असे म्हटले आहे. माझ्या बोलण्यामुळे काही गैरसमज निर्माण झाले आहेत. मी विविध भाषांच्या सह अस्तित्वावर बोलत होतो, असे जोशी यांनी नमूद केले.

## उत्तराखंडमध्ये बारमाही पर्यटन व्हावे; पंतप्रधानांची अपेक्षा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हरसिल (उत्तराखंड) : उत्तराखंडमधील बारमाही पर्यटनाचा पुरस्कार करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सुंदर डोंगराळ राज्यात कोणताही ‘ऑफ सीझन’ नसावा आणि प्रत्येक हंगाम ‘ऑन सीझन’ असावा ज्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात मजबूत होईल, असे प्रतिपादन केले. मुखबा येथील गंगा नदीसमोर प्रार्थना केल्यानंतर हर्सिलमधील एका जाहीर सभेला ते संबोधित करीत होते. पर्यटक जर हिवाळ्यात राज्यात आले तर त्यांना उत्तराखंडची खरी आभा बघायला मिळेल, असे ते म्हणाले. कार्यक्रमाला मुख्यमंत्री पुष्कर धामी उपस्थित होते.

कार्यक्रमाला संबोधित करताना त्यांनी त्यांना जाणवलेल्या एका भावनेचा उल्लेखही केला. गंगा मातेने त्यांना मुलासारखी मिठी मारली होती आणि त्यामुळेच मुखवा येथे आलो असल्याचे पंतप्रधान म्हणाले. चमोली जिल्ह्यातील माना गावात नुकत्याच झालेल्या हिमस्खलनात बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन कॅम्पमधील आठ कामगारांचा मृत्यू झाल्याबद्दलही त्यांनी दु:खही व्यक्त केले. पर्यटनाबरोबरच रोजगारही सुरू होईल. स्थानिक तरुणांना वर्षभर संधीही मिळेल. एक ‘३६०-डिग्री दृष्टिकोन’ आवश्यक आहे. सध्या मार्च, एप्रिल आणि जूनमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक पर्वतावर येतात, परंतु त्यानंतर त्यांची संख्या कमी होते. बारमाही पर्यटनामुळे उत्तराखंडची आर्थिक क्षमता वाढण्यास मदत होईल. १९६२ मध्ये जेव्हा चीनने भारतावर हल्ला केला तेव्हा सीमावर्ती गाव जाजुंग रिकामे करण्यात आले. आता त्याचे पुनर्वसन आणि विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे पंतप्रधान म्हणाले. दरम्यान, केदारनाथ आणि हेम कुंड साहिबसाठी कॅबिनेट समितीने मंजूर केलेल्या दोन प्रमुख रोपवे प्रकल्पांना केदारनाथ मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी आठ-नऊ



तासांचा प्रवास कमी होईल, अशी माहितीही त्यांनी दिली. राज्यातील हिवाळी पर्यटनासाठी गढवाली भाषेत ‘घाम तापो पर्यटन’ (सूर्यस्नान पर्यटन) चा संदेश देत हिवाळ्यात, जेव्हा देशाच्या मोठ्या भागावर धुके असते, तेव्हा पर्वत सूर्यप्रकाशाचा आनंद घेतात, असे प्रतिपादन केले. बारमाही किंवा ३६५ दिवसांच्या पर्यटनाला चालना देण्याच्या राज्य सरकारच्या दृष्टिकोनाचे त्यांनी यावेळी कौतुकही केले.

## अधिवेशन संपण्यापूर्वी छावणी चालकांची बिले अदा करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा / प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील ६१ व सांगोला तालुक्यातील १४९ चारा छावण्या सन २०१९-२० मध्ये दुष्काळी परिस्थितीत जनावरे जगवण्यासाठी सुरू करण्यात आल्या होत्या मात्र त्या छावण्यांची अंतिम बिले अद्याप अदा केलेली नाहीत ती बिले हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर अदा करावीत. पाच वर्षापासून हे छावणी चालक बिले मिळवण्यासाठी सरकारचे उंबरठे झिजवत आहेत. दुष्काळी परिस्थितीत या छावणी चालकांनी घरातील लग्न, दवाखाने, मुलांच्या शैक्षणिक अडचणीसुद्धा बाजूला ठेवून मुक्या जनावरांना जगवण्यासाठी छावण्या चालवल्या होत्या तरीही शासनाने अद्याप त्यांची उर्वरित राहिलेली बिले अदा केलेली नाहीत सध्या त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे इतक्या दिवस ही बिले का दिली नाहीत कोणत्या अधिकाऱ्यामुळे हे बिले प्रलंबित राहिली याची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी छावणीचालकांची बिले अदा करावीत अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित करीत केली आहे .



**आमदार अवताडे यांची अधिवेशनात मागणी**

यावेळी बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की ही बिले इतके दिवस प्रलंबित राहण्यामागे कारण काय? ही बिले प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार? बिलासाठी आत्महत्याचा विचार करणाऱ्या छावणी चालकांना तात्काळ बिले देऊन त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करणार का ? असा प्रश्न उपस्थित करून आमदार समाधान आवताडे यांनी छावणीचालकांचा प्रश्नांना वाचा फोडली या प्रश्नांना उत्तर देताना मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील म्हणाले की , ३३ कोटी ४४ लाख ९९ हजार एवढं छावणी चालकांचं अंतिम देयक राहिलेल आहे या देयकसंदर्भात असलेला सुधारित अहवाल राज्य शासनाच्या समितीकडे आलेला आहे या संदर्भात आजच मुख्य सचिवाला निर्देश देऊन पाच ते सहा वर्षापासून प्रलंबित असणाऱ्या देयकाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावू असे आश्वासन मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिले त्यामुळे छावणीच्या लोकांचा बिलाचा प्रश्न येत्या काही दिवसात मार्गी लागणार असल्याचे दिसत आहे.

## सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये केमोथेरपीची सुविधा उपलब्ध करणार : राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यासह देशांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. कर्करुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता चांगल्या प्रकारची उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोगावरील केमोथेरपी उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी आज विधानसभेत विभागावरील पुरवणी मागण्यांच्या चर्चेला उत्तर देताना सांगितले.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या, वर्ग ३ व ४ ची रिक्त पदे ग्रामविकास विभागामार्फत भरण्यात येणार आहेत. त्याचबरोबर कंत्राटी स्वरूपातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी जिल्हा पातळीवर अधिकार देण्यात आले आहेत. राज्यात कर्क रुग्णालयांची मागणी लक्षात घेता याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल.



नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात प्रत्येक जिल्ह्यामध्ये कर्क रुग्णालय उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे. महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत रुग्णालय सूचीबद्ध करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू तसेच माता मृत्यू थांबवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग व महिला आणि बाल विकास विभाग समन्वयाने काम करेल. राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करून रुग्णांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले.

### उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे ‘स्पेस टेक फॉर गुड गव्हर्नन्स’ परिषद

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ‘एआय’ आणि स्पेस टेकच्या वापरातून राज्याला पुढे घेवून जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : येणारा काळ हा स्पेस टेकचा असून ‘एआय’ आणि स्पेस टेकचा एकत्रित वापर करून राज्याला दोन पावले पुढे घेवून जाणार, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि स्पेस टेक यांच्या संयुक्त विद्यमाने ‘स्पेस-टेक फॉर गुड गव्हर्नन्स’ ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

या परिषदेसाठी लेफ्टनंट जनरल विनोद खंडारे (निवृत्त), डॉ.प्रकाश चव्हाण, माजी राज्यसभा सदस्य तथा रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ.विनय सहस्त्रबुद्धे आदी मान्यवर उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विविध क्षेत्रांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये स्पेस टेकचा वापर वाढलेला आहे. विविध उद्योगांमध्ये स्पेसटेकचे योगदान महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पेस टेकचे महत्व जाणून पॉलिसी तयार केली. खासगी क्षेत्राचा यामध्ये कसा समावेश करता येईल, चांगले काम चालू राहील यासाठी स्पेस टेकचा उपयोग केला जात आहे. रिमोट सोर्सिंग, ड्रोन जीपीएस यामध्ये स्पेस टेकचा वापर केला जातो. त्यामुळे कामकाजामध्ये पारदर्शकता दिसून येते.

पंतप्रधान यांच्या प्रेरणेने आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली गतिशक्ती प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले. काही वर्षांमध्ये होणारे काम स्पेस टेकचा वापर केल्यामुळे कमी दिवसांमध्ये पूर्ण होते. भविष्यात मॅन्युअल प्रोसेस बंद करून स्पेस टेक प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. यामुळे अडीच हजार कोटींची बचत होईल.

‘जलयुक्त शिवार’ या योजनेमध्ये २० हजार गावांमध्ये स्पेस टेक तंत्रज्ञानाचा वापर करून पाण्याचे नियोजन केले. दरड कोसळणे, पूर, भूस्खलन, भूकंप यासारख्या आपत्तीवेळी व्यवस्थापन करणे, ही बाब अत्यंत महत्वाची असते. परंतु त्याचे योग्य पद्धतीने मॉनिटरिंग करून येणाऱ्या आपत्तीवर नियंत्रण मिळविण्यासाठी, होणाऱ्या हानीचे प्रमाण कमी करण्यासाठी स्पेस टेकचा वापर केला जावू शकतो. आरोग्य, शिक्षण या विभागातही स्पेस टेकचा वापर केला जातो. येत्या तीन महिन्यांमध्ये स्पेस टेक पॉलिसी तयार करण्यात येणार असून स्टार्टअप आणि यासाठीची इकोसिस्टम तयार करण्यात येणार आहे, असेही त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जिओस्पॅशल तंत्रज्ञान ग्रामपंचायत विकास आराखडा (जीपीडीपी) बनविण्यात अत्यंत प्रभावी ठरू शकते. ‘स्पेस फॉर गुड गव्हर्नन्स कॉन्क्लेव्ह’ मध्ये उपग्रह प्रतिमा आणि भू-स्थानिक साधने यासारख्या अत्याधुनिक अवकाश तंत्रज्ञानाचा वापर ग्रामीण भारतातील आव्हानांना कसे तोंड देऊ शकतो, याचा शोध घेतला जातो. हा कार्यक्रम सरकार, उद्योग आणि तंत्रज्ञान संस्थांमधील आपापसातील समन्वय वाढ व सहकार्यासाठी उपयुक्त ठरणार असून या माध्यमातून नवोपक्रमांना चालना मिळेल, सार्वजनिक सेवा मजबूत होतील आणि शाश्वत विकासाला पाठबळ मिळेल अशी माहिती यावेळी देण्यात आली.

परिषदेतील उद्घाटन सत्रात रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक डॉ.जयंत कुलकर्णी यांनी प्रस्तावना केली. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण परिषदेचे सूत्रसंचालन गीता कुलकर्णी यांनी केले.

## संपादकीय....

# पर्यटनाचा पुरस्कार

उत्तराखंडमधील बारमाही पर्यटनाचा पुरस्कार करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सुंदर डोंगराळ राज्यात कोणताही 'ऑफ सीझन' नसावा आणि प्रत्येक हंगाम 'ऑन सीझन' असावा ज्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात मजबूत होईल. पर्यटक जर हिवाळ्यात राज्यात आले तर त्यांना उत्तराखंडची खरी आभा बघायला मिळेल, पर्यटनाबरोबरच रोजगारही सुरू होईल. स्थानिक तरुणांना वर्षभर संधीही मिळेल. एक '३६०-डिग्री दृष्टिकोन' आवश्यक आहे. सध्या मार्च, एप्रिल आणि जूनमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक पर्वतावर येतात, परंतु त्यानंतर त्यांची संख्या कमी होते. बारमाही पर्यटनामुळे उत्तराखंडची आर्थिक क्षमता वाढण्यास मदत होईल. १९६२ मध्ये जेव्हा चीनने भारतावर हल्ला केला तेव्हा सीमावर्ती गाव जाजुंग रिकामे करण्यात आले. आता त्याचे पुनर्वसन आणि विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. केदारनाथ आणि हेमकुंड साहिबसाठी कॅबिनेट समितीने मंजूर केलेल्या दोन प्रमुख रोपवे प्रकल्पांना केदारनाथ मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी आठ-नऊ तासांचा प्रवास कमी होईल. राज्यातील हिवाळी पर्यटनासाठी गढवाली भाषेत 'घाम तापो पर्यटन' (सूर्यस्नान पर्यटन) चा संदेश देत हिवाळ्यात, जेव्हा देशाच्या मोठ्या भागावर धुके असते, तेव्हा पर्वत सूर्यप्रकाशाचा आनंद घेतात, असे प्रतिपादन केले. बारमाही किंवा ३६५ दिवसांच्या पर्यटनाला चालना देण्याच्या राज्य सरकारच्या दृष्टिकोनाचे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुकही केले.

# स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मनुस्मृतीत स्त्रीयांचा वेदाभ्यास व विद्या संपादन करण्याचा अधिकार नाकारण्यात आला. त्यात ब्राम्हण स्त्रीयांचा देखील समावेश होता. एवढेच नव्हे तर एखादा विद्यार्थी वेद वाचत असतांना स्त्री जर समोर आली असेल तर त्याने वेद वाचने थांबवावे, असेही मनुस्मृतीमध्ये लिहिल्या गेले आहे. म्हणजे स्त्रीयांच्या बाबतीत मनु किती खालच्या पातळीवर गेला होता, हे सिध्द होते. पाच हजार वर्षापूर्वीचे हे स्त्री-स्वातंत्र्य गेल्या ५०० वर्षापासून समाजाने स्वार्थापोटी बेडीत अडविले होते. भारतामध्ये जेवढी स्त्रीयांची मनुस्मृतीने अवनती झाली, तेवढी कोणत्याही देशात झाली नाही. स्त्रीयांना या देशात अत्यंत हीन व पुरुषापेक्षाही दुय्यम स्थान देण्यात आले. हे मनुवाद्यांना माहित असतांना कधीही त्यांनी मनुचा विरोध केला नाही किंवा मनुस्मृती जाळली नाही, कारण त्यात त्यांचा स्वार्थ दडलेला होता. स्त्रीयांच्या अवनतीला ब्राम्हणवादी व्यवस्था कारणीभूत आहे, हे सिध्द होते. आज २१ व्या शतकात स्त्रीचं क्षितीज खुप विस्तारीत झालं आहे. निसर्गातच स्त्री एक नाजुक तशीच धाकड, कणखर आणि त्यागाची मुर्ती समजली जाते. त्याचबरोबर तिच्यात सोशिकता व प्रचंड सहन शक्ति आहे, म्हणुनच कुठल्याही क्षेत्रात आज बेडरपणे महिला आघाडीवर आहेत. आपण कुणाचे गुलाम नाही, अन्याय-अत्याचार झाला, तर तो सहन करणार नाही, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीने चालण्याचे समाधान आणि आत्मविश्वास त्यामुळे बळावतो. स्त्रीशक्ति इतकी बलाढय आहे की कोणत्याही परिस्थितीत ती स्वत:ला कमकुवत ठरु देत नाही, म्हणून तर त्यांनी निर्भय राहण्याचा चंग बांधला आहे.

अनेक वर्ष स्त्रीयांच्या भावना दाबल्या गेल्या म्हणून त्या आता उफाळून आल्या असं म्हणावं तर त्याचा अतिरेक झाला असं म्हणावं लागेल. स्त्रीमुक्ती हा विचार चळवळीचं रुप घेऊन आपल्याकडे आला आहे. वास्तविक स्त्रीमुक्ती हा शब्दच समाजानं उपहासात्मक करुन टाकला. स्त्रीमुक्ती या शब्दाची आणि त्यासाठी काम करणाऱ्या स्त्रियांना समान संधी मिळेल तेव्हा खिल्ली उडवत राहिला. तिला माणूस म्हणून जगायला मिळावं त्यासाठी स्वत: कुठल्याही तऱ्हेने पुरक न होता स्वातंत्र्यासाठी चाललेली तिची धडपड हास्यास्पद कशी ठरेल, याची वर उभे राहून वाट पाहत राहिला. तिच्याशी स्वत:चा काहीच संबंध नसल्यासारखा! तरीही उपहासाला थोडीही भीक न घालता स्त्री आज पाय रोवून उभी आहे. स्त्री-पुरुषातील विषमता, स्त्रीला पुरुषाने दिलेली गुलामीची वागणूक, तिच्यावर सदैव केलेली अरेरावी आजही वाढताहेत. शरीररचने पलिकडे अन्य कोणताही भेद स्त्री-पुरुषात असू शकत नाही म्हणून त्यांच्यासाठी सर्व कायदे, सर्व नियम सारखे असलेच पाहिजेत-भेदाभेद नको, तो अधिकार महिलांना मिळावा कारण व्यक्ती स्वातंत्र्यावरती हल्ला करणे लोकशाहीला अभिप्रेत नाही, तरी देखील प्रत्येक व्यक्तीला आपले विचार व्यक्त करण्याचे, आपला विचार निर्भिडपणे, अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाने प्रत्येकाला दिलेत. समाजाच्या विचारात व मानसिकतेत बदल होणे आवश्यक असून तो बदलल्याशिवाय स्त्री-पुरुष समानता साधल्या जावू शकत नाही.

थोडक्यात स्त्री-मुक्ति म्हणजे स्वातंत्र्याचा दुरुपयोग कुटुंब संस्थेला तडा नव्हे, स्त्री व पुरुष ही संसाररुपी स्थायी दोन समान चाके आहेत. ज्या रस्त्यावर हा रथ चालवायचा, तो रस्ता काही नियतीने अगदी गुळगुळीत करुन ठेवलेला नसतो. रस्त्यावर खाच-खडगे असणारच, संसाराचे देखील तसेच आहे. परस्पराच्या सामंजस्यातून हा संसाराचा रथ चालवावा लागतो त्याकरीता दोघांनीही त्याग करायला हवा. केवळ स्त्रीलाच त्यागाची, सहनशिलतेची मूर्ती बनवू नये. स्त्री-मुक्ति म्हणजे स्वत:चे व्यक्तिमत्व विकसीत करण्याचा हक्क प्राप्त करणे होय. १९९४ हे वर्ष खास महिलांसाठी धोरण आखणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आणि कालांतराने अशा महिला धोरणाचा राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. तरी देखील गेल्या २५ वर्षाहूनही अधिक काळ राज्यात या महिला धोरणांची यशस्वीरित्या अंमलबजावणी होतांना दिसून येत नाही, ही शोकांतिका आहे. परंतू ती प्रत्यक्षात होत आहे किंवा नाही हे पाहणे महत्वाचे ठरते, त्यासाठी शासनाने एक समिती नेमावी. जी आपला अहवाल शासनाला अंमलबजावणीच्या संदर्भात सादर करीत राहील, हा पायंडा पाडण्याची गरज आहे.

आज जन्माला आल्यावर पहिला संबंध आईशी म्हणजेच एका स्त्रीशी येतो. मानवी जीवनाचा उगम तिच्या पासुन होतो आणि म्हणून ती आपल्या सगळ्यांची निर्माती आहे. जगाचा स्त्रीकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोण असतांना देखील परिस्थिती बदलनं खुप कठीण होऊन बसतं. शिक्षणाच्या माध्यमातून लोकांची मानसिकताही बदलण्याची मोठ्या प्रमाणात गरज आहे. स्त्रीयां आणि मुलींसाठी कायदे आहेत, योजना आहेत, समान शिक्षणाच्या संधी देखील आहेत, पण समाजाने हे फायदे महिलांपर्यंत पोहचू न देण्याची मानसिकता कमी-अधिक प्रमाणात जाणवते. त्याची सुरुवात आई-वडीलांकडुन व्हायला हवी तरच मुलींना मुख्य प्रवाहात आणता येईल आणि तेव्हाच कुठे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास बळावेल. तसा प्रयास 'दंगल' या चित्रपटात कुस्तीगीर म्हणुन फोगाट या व्यक्तिरेखेत स्त्रीला आणून एक नविन पायंडा निर्माण करण्यात आला, ही खरंच देशाभिमानी बाब आहे.

विचारांची व परंपराची जी श्रृंखला सातत्याने सुरु आहे, ती मोडीत काढणे म्हणजे मुक्ती होय. पुरुषांना व स्त्रीयांना समान हक्क आहेत. पण ही समानतेची 'मुक्ति' आपणांस फक्त कागदोपत्रीच दिसते. स्त्री ही जन्मापासून कुणाच्या ना कुणाच्या तरी अधिकारात वावरत असते. स्त्री सुशिक्षित झाली म्हणजे तिच्या बुध्दिला खाद्य मिळेल व ती समानतेसाठी भांडूही शकेल. त्याचप्रमाणे शिक्षणामुळे आर्थिक दृष्ट्याही स्वाबलंबी बनेल. त्यातूनच स्वावलंबनाची भावना स्त्रीमध्ये जागृत होऊन ती खंबीर बनण्यास मदत होईल. त्यामुळे स्त्री ही स्वत:ही मुक्ति घडवू शकते व सक्षम असू शकते. स्त्री वैचारिक दृष्ट्या ज्यावेळी स्वतंत्र होईल, खंबीर होईल, तीच खरी स्त्री मुक्ति !

महिलांसाठी दिलेल्या ५० टक्के आरक्षणामुळे अनेक ठिकाणी म्हणा जसे महानगर पालीका, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या हाती सत्ता आल्याचे दिसून येते. दिवसेंदिवस महिलांचा सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही सहभाग पाहता वावरही वाढत चाललेला आहे. भारताच्या राष्ट्रपती पदी आणि लोकसभेच्या अध्यक्षपदी, खासदार, आमदार, महापौर, सरपंच, नगरसेवक पदी, शिक्षण क्षेत्र असो वा क्रिडा असो, प्रत्येक क्षेत्रात महिला विराजमान व आघाडीवर आहेत. महिलांचे शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अधिक सक्षमीकरण करण्यासाठी व उन्नतीसाठी महिलांना ५० टक्के आरक्षण दिल्यामुळे त्या आता सहज माणसाबरोबर भिडून उलट त्यांच्या पेक्षा जास्त कुवत निर्माण करण्यात सिंहाचा वाटा उचलत आहे, त्यामुळे त्यांच्या जगण्याचा स्तर नक्कीच वाढतो आहे, यात तिळमात्र शंका नाही. अशा वेळी महिलांना वंचित ठेवता कामा नये. त्यांनाही संधीचं सोनं करु दयायला पाहिजे. महिलांना आपली कुवत सिध्द करण्यासाठी थोडी 'स्पेस' द्यावी तरच समानतेचा प्रवास योग्य दिशेने होतोय असे ठाम पणे म्हणता येईल. स्त्री ही परिवाराचा कणा असून तिच्या शिवाय घर हे सुने असते. विकसित भारताचे स्वप्न साकार करावयाचे असेल तर आपल्याला स्त्रीला समाजात, कार्यक्षेत्रात योग्य तो सन्मान दिलाच पाहिजे. समान संधी व समान अधिकार या दोन्हीचा जागरुकतापूर्वक वर्तन व्यवहार पुरुषांकडुन होणे गरजेचे आहे.

वर्तमानपत्र हातात घेतल्यावर पहिल्याच पानावर रकानेचे रकाने वाचताक्षणी विचारांचे काहुर मनात थैमान घालतात, कारण महिलांवर बलात्कार, विनयभंग, खुन, अपहरण, लैंगिक अत्याचार दिवसें-दिवस वाढत आहेत. महिलांना असुरक्षितता सारख्या अशा अनेक समस्या भेडसावत आहेत. वीज, पाणी, बेराजगारी पेक्षा भयंकर अशी शोषण प्रणाली किळसवाणीच वाटायला लागली की कधी-कधी मनात सारखा विचार धुमसत असतो की, जे नराधम असे कृत्य करतात त्यांची त्याच ठिकाणी नांगी ठेचून संपवून टाकले पाहिजे. त्यानंतर उर्वरित कारवाई करावी. हे जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत असे सुरुच राहणार आहे, निर्बंध नावाची वस्तुच दिसेनासी झाली आहे. तेव्हा महिला दिन कां म्हणुन साजरा करायचा ? असा अनाकलनीय प्रश्न सारखाच निर्माण होतो. याला कारणीभुत शासनच आहे, असे म्हणायला हरकत नाही. तेंव्हा आता तरी शासनाने कठोर व कणखर असे कायदे तयार करावेत जेणेकरुन महिलांच्या इभ्रतीस तडा जाणार नाही, याची दखल घ्यावी लागेल.

स्त्रीयांना परंपरागत गुलामगिरीतून काढून स्वातंत्र्य देण्याचे व तिचे उध्दार करण्याचे कार्य, भगवान बुध्द, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवांनी केले आहे, याला भारतीय इतिहासात तोड नाही. काळ जसा जसा पुढे सरकेल येणारी पिढी प्राचीन भारतातील गुलाम स्त्री व आधुनिक भारतातील स्वातंत्र्य स्त्रीयांचा तुलनात्मक अभ्यास करेल. तेव्हा संपूर्ण देश फुले-आंबेडकरांच्या स्त्रीमुक्तीच्या कार्यापुढे झुकल्याशिवाय राहणार नाही, हे केवळ संविधानामुळेच हे तेवढेच खरे ! ८ मार्च महिला दिन तोंडावर असतांना लज्जास्पद गोष्टी समोर येत आहेत आणि आपण आदरासाठी भांडतो पण आपण जबाबदारीने वागतो कां ? याचा विचार प्रत्येक स्त्रीने करावा. आपला नवरा, आपली मुलं, सासु-सासरे, आई-वडील यांच्याकडे दुर्लक्ष करत किंवा त्यांना 'बाहेरुन ऑर्डर करा' असं सांगुन आपण खुशाल पाटर्या करत हिंडत बसायचं यात कसलं आलंय स्त्रीत्व ? प्लीज यावर विचार कराअध्यात्माची जोड आयुष्यात द्या, त्यामुळे आपण एका वेगळया लेव्हलवर (समानतेवर) कायमच राहतो.

महत्वाचा मुद्दा इथे नमूद करावासा वाटतो तो म्हणजे, भटांमुळे विधवा स्त्रियांच्या वाटयाला येणारे अनेक अपमान, अत्याचार, नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्यांना कोणी वाली नसल्यामुळे मुस्कटदाबी व्हायची पुरुषाच्या वासनेत त्यांचा बळी जाणे अशा घटनांना विधवांना नित्य तोंड द्यावे लागत असे. त्यांच्यावर अत्याचार करणारे ही पुरुषच आणि त्यांना शिक्षा फर्मविणारे पुरुषच ! अशा अगतिक विधवांचा कोणी रक्षणकर्ता नसे. अशावेळी जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आपल्या घरावर, विधवांनो इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा, तुम्ही आपले मुल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अबलंबून राहील. त्या मुलाची काळजी हा अनाथाश्रम घेईल अशी पाटी लावावी ही नाडलेल्या विधवांनी किती दिलासा देणारी गोष्ट, जी आजवर कोणीही करु शकले नाहीत ! धन्य ते फुले दाम्पत्य !

स्त्रीयांनी पुरुषांच्या अधिकाधिक स्वाधीन व्हावे. पुरुषांनी स्वच्छंदाने वागावे. शेवटी इथ पर्यंत मजल आली की, माझी स्त्री मी मेल्यावर दुसऱ्याकडे पाहिलं तर, त्यापेक्षा माझ्याबरोबर जळून जाईल तर बरे, यातच नावलौकिक आहेज्यात विधवेचे वपन करावे म्हणून लिहिले आहे, जो ग्रंथ (मनुस्मृती) जाळण्याच्या योग्यतेचाच नव्हे तर काय ? म्हणूनच तर डॉ. बाबासाहेब आंबेडरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करुन हा किळसवाना प्रकार थांबविण्याचा प्रयत्न केला. संसदेत हिंदू कोड बील सादर करतांना देखील या उच्चवर्णियांनी विरोध केला होता. म्हणून डॉ. आंबेडकरांना कायदेमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला, ही वस्तूस्थिती आहे.

स्त्री व पुरुष दोघंही समान आहेत आणि सुख मिळविण्यासाठी धडपडणं हा दोघांचाही अधिकार आहे. फक्त पुरुषानं आयुष्यभर सुखात राहावं आणि दु:खाचा सगळा भार स्त्रीयांच्या खांदयावर टाकावा, ही सुख-दु:खाची विभागणी आजही अव्याहत सुरु आहे, ती संपली पाहिजे. माणुस या नात्यानं पुरुषाला मिळतं ते जन्मसिध्द स्वातंत्र्य स्त्रीलाही मिळालं पाहिजे. कारण आजच्या काळातील स्त्री ही शिक्षणाने सक्षम झालेली आहे. पण काळाच्या ओघात परिवर्तनाशिवाय पर्याय नाही. या सबबी नंतर स्त्रीने टोकाचं पाऊल उचलुन भरारी घेण्याचं ठरवलं आहे. आज ती शिक्षणापासुन राजकारणापर्यंतच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करुन कुटुंबाबरोबरच समाजाच्या उभारणीत आणि देशाचा नावलौकिक मिळविण्यात मोलाची भुमिका बजावत आहेत. कर्तबगार, कर्तव्यदक्ष, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या जोरावर त्यांनी आपण कमी नसल्याचं वारंवार सिध्द केले आहे व आज ही करत आहे. आता स्वत:ची म्हणून एक स्वतंत्र वाट चोखाळून स्वातंत्र्यासाठी तिचा लढा आजही चालू आहे, अशा कर्तव्यदक्ष धाडसी वृत्तीच्या महिलांना जागतिक महिला दिना निमित्त मानाचा मुजरा !



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com




### ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त व्यक्ती विशेष...

# लक्ष्मी फुलारी-अरोरा एक प्रेरणादायी व्यक्तीमत्व



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

एके काळी समाज व्यवस्थेमुळे चुल आणि मुल इथपर्यंतच मर्यादीत असलेली स्त्री ही आज सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबर खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहे.भारतीय संविधानाने दिलेल्या घटनात्मक आधिकारामुळे महिलांना शिक्षणाची संधी मिळाली. त्यामुळे चुल आणि मुल ही मर्यादा ओलांडून घटनात्मकदृष्ट्या मिळालेल्या शिक्षणाच्या संधीचा फायदा घेऊन आज महिला शिक्षक,प्राध्यापक,डॉक्टर,वकील, इंजिनिअर,न्यायाधीश,आमदार,खासदार,मंत्री,जिल्हाधिकारी,तहसीलदार, गटविकास आधिकारी,पोलीस दलात,सैन्य दलात,अशा प्रकारे सर्वच क्षेत्रात महिला ताकतीने काम करताना दिसत आहेत. एवढेच नव्हे तर आज देशाच्या सर्वोच्च पदी महिला विराजमान झालेली आहे.त्यात ग्रामीण भागातील महिला ही मागे नाहीत.प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन ग्रामीण भागातील महिला ही सर्व क्षेत्रात काम करताना दिसत आहेत. त्यात ग्रामीण भागातील लक्ष्मी चंद्रकात फुलारी-अरोरा ह्या एक आहेत.



लक्ष्मी चंद्रकांत फुलारी (लक्ष्मी मुन्ना अरोरा) यांचा जन्म दि.३/११/१९८६ रोजी जेवळी ता. लोहारा जिल्हा धाराशिव येते सामान्य कुटूंबात झाला. त्यांच्या लहानपणी वाडीलांचे निधन झाले.त्यामूळे त्यांची आणि त्यांच्या मोठ्या बहिणींची जबाबदारी त्यांच्या आईवर पडली. आईच शिक्षण जेम तेम इ.चौथी पर्यंत झालेले.घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची.पतीचा अधार तुटलेला तरी ही त्यांची आई खचली नाहीं.त्यांचेआणि त्यांच्या बहिणीच्या शिक्षणासाठी फार मोठे कष्ट त्यांच्या आईने घेतले. लहानाचे मोठे करून

इ.१०वी पर्यंत शिक्षण देवून कष्टावर लक्ष्मी फुलारी आणि त्यांची बहीण दोघींचे लाड कौतुक पूर्ण करून लग्न करून दिले. लग्ना नंतर आपल्या मुलीनी छोटी मोटी नौकरी करावी स्वःताच्या पायावर उभे राहवे असी त्यांच्या आईची खूप इच्छा होती.आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्या नौकरीच्या शोधात असतानाच महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळात वहाक पदाची भरती निघाली.त्यांच्या आईने त्यांच्या पतिला वहाक पदाच्या भरती बाबत संगीतले.त्यांच्या पतीनेही त्यास सहमती दिली. आईची इच्छा, त्यानी आणि त्यांच्या पतीने वहाक पदच्या भरती साठी केलेले प्रयात्न फळला आले.सन २००९ साली लक्ष्मी चंद्रकांत फुलारी-अरोरा ह्या कंडक्टर (वहाक ) म्हणून मुंबई ठाणे-२ एस.टी. अगारात रुजू झाल्या.आईची तिव्र इच्छा पतीची समर्थ साथ आणि दोघानी एकमेकावर टाकलेला विश्वास यामुळे तब्बल ८ वर्षे ठाणे अगारात प्रामाणिक पणे आणि निष्ठेने लक्ष्मी फुलारी- अरोरा यानी सेवा केली. त्यांचा सर्व परिवार गावाकडे असल्याने त्यानी बादली साठी अर्ज केली. त्यांचा बदलीसाठी केलेला अर्ज महामंडळाने मंजूर करून सन २०१८ ला धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर अगारात त्यांची बदली केली.तेंव्हा पासून ते आज तागायत त्या तुळजापूर अगारात वहाक म्हणून कार्यरत असून ते प्रामाणिक पणे आणि निष्ठेने आपले कर्तव्या पार पाडत आहेत. त्यांच्या एकूनच जिवन कार्याचा विचार केला तर लक्ष्मी फुलारी-अरोरा म्हणजे शिक्षण घेवून स्व:ताच्या पायावर उभे राहण्यासाठी धडपडणाऱ्या मुलींसाठी एक प्रेरणादायी व्यक्तीमत्वच म्हणावे लागेल.

दि.८ मार्च जागतीक महिला दिना निमित्ताने त्याना आणि कर्तव्यदक्ष सर्व महिलाना हार्दीक शुभेच्छा...

**– एस.के.गायकवाड**
**वागदरी प्रतिनिधी ता. तुळजापूर**
**मो.न.९३७४२३**

## उपविभागीय अधिकारी श्री. इथापे यांची मौजे सावळेश्वर (ता.मोहोळ) येथे क्षेत्रभेट

# शासकीय योजनांच्या लाभासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावा : उपविभागीय अधिकारी सचिन इथापे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शासकीय योजनांच्या लाभासाठी फार्मर आयडी (ग्री स्टॅक) बनवणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक (फार्मर आयडी) मधून कृषी व महसूल विभागाच्या विविध योजनांचा लाभ पारदर्शिपणे व कुठल्याही अडचणी शिवाय दिल्या जाणार असल्याने सर्वांनी फार्मर आयडी काढून घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

शंभर दिवसांच्या कृती आरखड्यातंर्गत उपविभागीय अधिकारी श्री. इथापे यांची आज मौजे सावळेश्वर (ता.मोहोळ) येथे क्षेत्रभेट दिली. यावेळी सहायक महसूल अधिकारी चंद्रकांत ढवळे तसेच सावळेश्वर मंडळातील मंडल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, तसेच पोलीस पाटील उपस्थित होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी श्री इथापे म्हणाले शासनाच्या मिळणाऱ्या सर्व योजना या शेतकरी प्रमाणपत्रावर आधारित असून शेतीचा सर्व माहितीचा संच ग्री स्टॅग मधून शासनाला प्राप्त होणार आहे. शेतकऱ्यांना पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना, पीक विमा योजना, कृषी विभाग यांत्रिकीकरण योजना, थेट लाभा हस्तांतरण योजना, पीक कर्ज सुलभपणे मिळवण्यासाठीच्या या ओळखपत्राचा उपयोग होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र काढणे आवश्यक आहे. मौजे सावळेश्वर येथील फार्मर आयडी (ग्री स्टॅक) नोंदणीचे



प्रमाण फक्त ३८ टक्के असून हे प्रमाण खूप कमी असून शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढावेत.

तसेच गावातील गरीब व गरजू लोकांना धान्य मिळत नाही त्या त्यांनी अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावेत व गावातील जे लोक सध्या प्राधान्य कुटुंबामध्ये समावेश आहेत परंतु त्याची आर्थिक स्थिती चांगली असल्यास त्यांनी स्वतःहून अन्नसुरक्षा योजनेचा लाभ सोडावा जेणेकरून पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. संजय गांधी श्रावणबाळ वृद्धापकाळ योजना साठी पात्र लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा. यावेळी रोजगार हमी योजनेद्वारे चालू असणारे महात्मा गांधी सिंचन विहीर व गाई गुरांचा गोठा फळबाग लागवड योजना व शेत तळे कंपोस्ट खत तयार करणे या योजनाची माहिती दिली. रोजगार हमी योजनेतून



सुरु असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. घरकुल प्रकरण मंजूर असणारे परंतु घरकुल बांधण्यासाठी जमीन नसणाऱ्या मागासवर्गीय नागरिकांना शासनातर्फे दिनदयाळ उपाध्याय योजनेद्वारे जमीन खरेदी योजना चा लाभ घ्यावा असे आवाहन प्रांताधिकारी इथापे यांनी केले. तसेच यावेळी ग्रामस्तरावरील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणे शासनाच्या सर्व योजनेमध्ये ग्रामस्थरातील लोकांचा सहभाग वाढवणे व प्रशासन व ग्रामस्थांमध्ये समन्वय राखून सहकार्य करण्याच्या सूचना संबधित पोलीस पाटील यांना देण्यात आल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कॉपीमुक्त परीक्षेकडे यशस्वी वाटचाल; पालकांनी केले कौतुक

## मोडकळीस आलेल्या बाकांकडे (डेक्स) दुर्लक्ष; शिक्षण व्यवस्थेचे वाजले तीन तेरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : दहावी, बारावी परीक्षा कॉपीमुक्त व्हावी,यासाठी माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नवा पॅटर्न घेतलेल्या निर्णयामुळे तालुक्यात कॉपीमुक्त परीक्षेकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे.याचे स्वागत व कौतुक देखील होत आहे.परंतु अपवाद वगळता परीक्षा केंद्रात तुटफुट डेस्क (बेंच) मुळे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडवताना मोठा त्रास सहन करावा लागल आहे.

कॉपीमुक्तच्या नादात तुटफुट डेक्स कडे दुर्लक्ष केल्यामुळे पालकांमध्ये मोठी नाराजी दिसून येत आहे.

कॉपीमुक्त परीक्षेसाठी त्याच परीक्षा केंद्रातील शिक्षकास प्रवेशक म्हणून नेमणूक न करता एका केंद्रातील दुसऱ्या केंद्रावर शिक्षकांना पर्यवेक्षक म्हणून निवड करण्यात आली.तसेच प्रत्येक वर्गात सीसी कॅमेरा बसवण्यात आले असुन प्रत्येक वर्गातील पर्यवेक्षकांना परीक्षा संपेपर्यंत झूम कॅमेरा चालू ठेवण्याचे आदेश देण्यात आले.त्या आदेशाचे पालन तंतोतंत होत आहे.यामुळे कॉपीमुक्त दिशेने परीक्षा सुरळीत वाटचाल करित आहे.परीक्षा केंद्राबाहेर शांतता दिसुन येत असुन संबंधित विषयाचे शिक्षक देखील परिक्षा केंद्रात दिसल्या नाही. सीसी कॅमरा आणि झूम कॅमेरामुळे शिक्षकासह सर्वांना धास्ती भरली आहे.

कॉपीमुक्त शांततेत परीक्षा सुरू असताना नेमण्यात आलेल्या भरारी बैठा पथक मात्र दर पाच ते दहा मिनिटांनी वारंवार वर्गावर चकऱ्या मारल्या जात असल्याने विद्यार्थ्यांचे लक्ष मात्र त्या भरारी पथकाकडे केंद्रित होत आहे. त्यामुळे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे वेळ वाया जात आहे. सी सी कॅमेरा झूम कॅमेरा असताना वारंवार भरारी पथक वर्गावर जाणे म्हणजेच झूम कॅमेरा आणि सीसी कॅमेरावर शिक्षण विभागाचा विश्वास नाहीच असा प्रश्न उपस्थित होत आहे.सीसी व झुम कॅमेरा असताना सात,आठ लोकांच्या भरारी पथक कशासाठी नेमणूक केल्या हा संशयास्पद आहे.भरारी पथकाची घोळके नेमका कोणाची घोळ करीत आहे.हे समजायला तयार नाही.

परीक्षा केंद्रावरील अनेक वर्गातील डेक्स तुटके-फुटके, लळकलुळक आढळून आल्याने शिक्षण व्यवस्थेचा तीन तेरा झाले होत आहे, अपवाद वगळता अनेक ठिकाणी शिक्षण व्यवस्थेबाबत अनास्था दिसून येतो, या प्रकारामुळे परीक्षेतील व्यवस्था येथील शिक्षण विभागाचा भोंगळपणा चाट्यावर आला आहे याला जबाबदार कोण? पालक मात्र संभ्रम अवस्थेत आहे.



**सीसी कॅमेरा आणि झूम कॅमेरा चालु असताना बैठा पथकांच्या डझनभर लोकांनी परीक्षा केंद्रावर पाच दहा मिनिटांनी परिक्षा केंद्रात फेऱ्या मारत आहेत.**

**याच्या मागील कारण काय,त्यांचा झूम कॅमेरा आणि सीसी टिव्ही कॅमेरावर भरोसा नाही का?बैठा पथकांचे दहशत निर्माण करण्याचा हेतू तर नसेल?यामुळे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर मानसिक परिणाम होत असुन एकाग्रह न होता भितीयुक्त परिक्षा देत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम नक्कीच होईल.**

**– ज्योतीबा पारखे,**
**सामाजिक कार्यक्रता अक्कलकोट**



**शिक्षण मंडळाने कॉपीमुक्त होण्यासाठी उचललेले पाऊल योग्य आहे. आम्ही त्यांच्या निर्णयाचे स्वागत करतो. परंतु परिक्षा केंद्रात तुटके फुटके डेक्समुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देताना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो आहे. याकडे शिक्षण मंडळाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष का केले. याचा खुलासा शिक्षण मंडळाने द्यावे, अन्यथा शिवसेनेच्यावतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल.**

**– आनंद बुकानुरे**
**शिवसेनाप्रमुख ता.अक्कलकोट**



**परीक्षा केंद्रावर सोयी – सुविधा पुरवण्याचा अधिकार केंद्र संचालकांचा असुन परीक्षा केंद्रात काही तुरट्या आढळून आल्यास त्यांची तक्रार वरिष्ठाकडे पाठवणार आहे. झूम कॅमेरा आणि सीसी कॅमेरा बंद आहे की चालू यांचे निरीक्षण आमचे बैठा पथक करित आहे.**

**शंभर टक्के कॉपीमुक्त व्हावे तो आमचा मुख्य उद्देश आहे.**

**– प्रशांत आरबाळे**
**गटशिक्षणाधिकारी पं.स. अक्कलकोट**

## थोडक्यात...

### दुकान फोडून रोख रक्कम पळविली

सोलापूर : जुळे सोलापूर येथील वामन नगर येथे चॉकलेट पान हाऊसचे शटर उचकटून दुकानातील रोख रक्कम २६ हजार ५०० रुपये चोरून नेल्याची घटना दोन मार्चला घडली. याप्रकरणी बिलाल अब्दुल गफार शेख (वय ३५ रा. क्रिस्टंट टावर,काजल नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### मोबाईल चोरट्याला केली अटक

सोलापूर : पंधे अपार्टमेंट येथे मोबाईल चोरून नेल्याची घटना पाच मार्चला घडली. याप्रकरणी आकाश सूर्यकांत नारायणकर (वय-२८,रा.पंधे अपार्टमेंट) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अशितोष उर्फ अशोक संतोष शेंडगे (रा. उद्यान चौक, बुधवार पेठ) याला अटक केली.

### कन्ना चौक येथून दुचाकी पळविली

सोलापूर : कन्ना चौक येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच.१३.ए.वी ७४५७) ही चोरून नेल्याची घटना दोन फेब्रुवारीला घडली. याप्रकरणी स्वप्निल राजेंद्र आडकी (वय-२४, रा. गुरुवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### गर्दीचा फायदा घेत चोरट्याने मोबाईल पळविला

सोलापूर : शनि मंदिर वल्याळ मैदान येथे दर्शनासाठी गेले असता गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने मोबाईल चोरून नेल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी शशिकांत गोरखनाथ सुतार (वय-२५, रा. महादेव मंदिर हगलूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# मेरा ते दरेगाव मार्गे रेती वाहतूक जोमात तलाठी मंडळ अधिकारी सुस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

मेरा ते दरेगाव मार्गे अवैध रेती वाहतूक रात्रीच्या वेळी . जोमात चालू असून . महसूल विभाचे गाव पातळीवरील कर्मचाऱ्यांच्या आशिर्वादाने चालतो की काय असा सवाल गावकऱ्यांना वाटत आहे अवैध रेती उत्खनन करत असलेले वाहन पकडून सोडून दिले जातात. वरीष्ठ अधिकारी यांनी या बाबींकडे लक्ष देणे गरजेचे असून रात्री च्या वेळी अवैध रेती उत्खनन करत असलेले टीपर भरधाव वेगाने चालत असल्याने . मोटरसायकल . सारख्या वाहनांना रोडच्या खाली जावे लागते. रात्री च्या वेळी टीपरच्या फोकसने समोर दिसत नसल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महसूल प्रशासनाचे गाव पातळीवरील तलाठी मंडळ अधिकारी यांची जुलीमिली भगत आहे की.काय असा सवाल गावकऱ्यांना व मोटरसायकल धारकांना वाटत असल्याने.वरीष्ठ अधिकारी यांनी मेरा ते दरेगाव मार्गे अवैध रेती उत्खनन . करणाऱ्यां वाहनांवरती लक्ष देण्याची गरज.

# उरुळी कांचन येथे महाराष्ट्र पोलीस न्यूज २४ यांच्या वतीने अनिता खरात यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : दि. ६ मार्च रोजी उरळी कांचन या ठिकाणी महाराष्ट्र पोलीस न्यूज २४ (न्यूज चैनल) चा वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी महिला दिनाचे औचित्य साधत विशेष सन्मान म्हणून समाजभूषण पुरस्काराने इंदापूरच्या सामाजिक कार्यकर्त्या व तेजपृथ्वीग्रुप च्या संस्थापक अध्यक्षा अनिताताई खरात यांना सन्मानित करण्यात आला.



**श्री..श्री.. १००८ महामंडलेश्वर डॉ.स्वामी शिवलक्ष्मी नंदगीरी आईसाहेब यांच्या उपस्थितीत अनिता ताई खरात यांना पुरस्कार प्रदान**

त्यांनी इंदापूर या ठिकाणी अनेक गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तक, गणवेशाची मदत केली आहे. तसेच इंदापूर तालुक्यातील ज्या भागांमध्ये एस.टी.(बस) ची सोय नाही. अशा भागामध्ये एस.टी. (बस) ची सोय त्यांच्या प्रयत्नातून सुरू झालेली आहे. अनेक रुग्णांच्या मदतीला ते सतत धाऊन जातात रात्रंनदिवस समाजाची सेवा करणे हाच त्यांचा एकच ध्यास आहे. या सर्व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

महाराष्ट्र पोलीस न्यूज २४ इंदापूर तालुका प्रतिनिधी शिवाजी (आप्पा) पवार यांच्या माध्यमातून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. श्री. १००८ महामंडलेश्वर डॉ. स्वामी शिवलक्ष्मी नंदगिरी आईसाहेब उपस्थित होत्या. कार्यक्रमाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सामाजिक कार्यकर्ते पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र पोलीस न्यूज २४ चे संपादिका सौ. स्मिताताई बाबरे व महाराष्ट्र राज्य संपादक रमेश मामा गगणे यांनी केले होते.

# अक्कलकोट येथे शिवभक्त बेडर कन्नप्पा महाराज यांच्या प्रतिमेची निघाली भव्य दिव्य मिरवणूक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शिवभक्त बेडर कन्नप्पा महाराज यांच्या जयंती निमित्त अक्कलकोट शहरात भव्य दिव्य अशी मोठी मिरवणूक काढण्यात आली.

ही भव्य दिव्य मिरवणूक सोमवार दिनांक मिरवणूक दिनांक –३/३/२०२५ रोजी काढण्यात आली. या मिरवणुकीस प्रमुख उपस्थिती म्हणुन अक्कलकोट चे रॉयल नगरदेवक मिलन दादा कल्याण शेट्टी , श्री अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त अमोल राजे भोसले , सोलापूरचे बेडर समाजाचे युवा नेता (खड्डा तालीम) आकाश भाऊ कामाटी , अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक टोकणे साहेब , यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये शुभारंभ करून काढण्यात आली.

याप्रसंगी सोलापूर भाजप जिल्हा अल्पसंख्या अध्यक्ष ननू कोरबू , सोलापूर लष्कर विभाग युवा नेता अमोल भोसले , जरूर झंपले , जय मल्हार क्रांती संघटना सोलापूर शहर अध्यक्ष सिद्धू नाईकवाडी ( हत्तुर) बेडर समाजाचे पंच कमिटी अक्कलकोट –शिवाजी माने , नागनाथ गुंजले , लक्ष्मण मिनगले, लक्ष्मण झंपले , दत्ता माने , भीमा मलवे सोलापूर जिल्हा अध्यक्ष जय मल्हार क्रांती संघटना हनुमंत घोसले , महादेव अनगले , चट्टप्पा मिनगले , भीमा मिनगले, धर्मा गुंजले लखन झंपले , गोटू मलवे, प्रशांत कानडे, पिंटू मिनगले , शेखर गुंजले ,अक्कलकोटचे युव नेता शिवा मलवे, बसवराज घो घोसले, खाजप्पा झंपले, राहुल माने, पवन अनगले, छोटू मलवे, लकी कुरले, खाजप्पा माने, प्रशांत कुरले उत्सव अध्यक्ष-समर्थ प्रकाश मलवे मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते

दरम्यान शिवभक्त बेडर कन्नप्पा महाराज यांच्या प्रतिमेची गावांतून भव्य आणि दिव्य अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. बी के ग्रुप बेडर गल्ली अक्कलकोट यांच्या सहकार्याने आणि समाजाच्या वतीने ही भव्य मिरवणूक वाजत गाजत आकर्षक पद्धतीने काढण्यात आली.

# समीक्षा फाउंडेशनच्या वतीने आंबेडकरवादी कवी संमेलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे/प्रतिनीधी : सामाजिक व धार्मिक कार्यकर्त्या स्मृतीशेष इंदुबाई तुकाराम गायकवाड यांच्या तिसऱ्या स्मृतीदिनानिमित्त समीक्षा फाउंडेशनच्या वतीने दिनांक ८ मार्च २०२५ रोजी वारजे येथे पहिली ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप आणि आंबेडकरवादी कवी संमेलन संपन्न होणार आहे या संमेलनात जेष्ठ आंबेडकरवादी साहित्यिक महभा चव्हाण सुनील गायकवाड हर्षानंद सोनवणे दुर्योधन आहे रे मोहन दुसाने नरेंद्र बनसोडे बाबासाहेब जाधव अनंता जाधव हे कवी सहभागी होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून कृषी महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल डॉ .किशोर पाटील यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडणार आहे. समीक्षा फाऊंडेशनचे प्रमुख डॉक्टर डी टी गायकवाड यांचेकडून सर्वांना उपस्थित राहण्याचे आव्हान करण्यात आले आहे.

**विशेष सहाय्य विभागाच्या योजनांचा प्रचार व प्रसारासाठी जनकल्याण यात्रेला सुरुवात**

**जनकल्याण यात्रा २०२५ चा शुभारंभ; राज्यभर योजनांचा जागर होणार**

# जनकल्याण यात्रेद्वारे योजनांचा होणार जागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : शासनाच्या विशेष सहाय्य विभागाच्या वतीने जनकल्याण यात्रा २०२५ चे आयोजन राज्यभर करण्यात आले आहे. या यात्रेच्या माध्यमातून विशेष सहाय्य विभागाच्या सर्व योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम मोबाईल एलईडी व्हॅनमार्फत राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये करण्यात येत आहे. या जनकल्याण यात्रेचा शुभारंभ विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते दिंडोरी, नाशिक येथील झाला आहे.

ही यात्रा राज्यभर होत असून आपल्या जिल्ह्यामध्ये आता जनकल्याण यात्रा पोहोचली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात या योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आली. विशेष सहाय्यक विभागाच्या योजनांवर आधारित माहितीपट त्याचबरोबर माहितीपत्रके नागरिकांना वाटण्यात आली.

विशेष सहाय्य विभागाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना या सहा मुख्य योजना राज्य व केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजना आहेत. लाभार्थ्यांना डीबीटी पोर्टलद्वारे लाभाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. योजनेचा लाभ मिळवण्यासाठी लाभार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते आधार संलग्न असणे आवश्यक असून, सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी संबंधित तहसील कार्यालय अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन लघुपटाच्या माध्यमातून विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे.

ही यात्रा एकूण पंधरा दिवस सुरू राहणार असून, सोलापूर जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय येथून या जनकल्याण यात्रेचा शुभारंभ निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. यावेळी महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, तहसिलदार निलेश पाटील, तहसिलदार शिल्पा पाटील, लोकमंगल सहकारी बैंकेचे संचालक प्रल्हाद कांबळे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

**सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथून या जनकल्याण यात्रेचा निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्या हस्ते शुभारंभ**

या यात्रे करता एलईडी व्हॅनद्वारे दाखवण्यात येणाऱ्या माहितीपटाची निर्मिती व दिग्दर्शन शंकर बारवे यांनी केले असून सदर माहितीपट मोबाईल एलईडी व्हॅनद्वारे राज्यातील विविध गावात व शहरात दाखविण्यात येऊन जनजागृती करण्यात येत आहे. त्याद्वारे लाभार्थ्यांपर्यंत योजनेची माहिती पोहचविण्यात येणार आहे.

या माहितीपटाद्वारे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, आपले राज्य सरकार आणि केंद्र सरकार समाजातील गोरगरीब, वंचित, ज्येष्ठ, वृद्ध, विधवा आणि दिव्यांगांच्या कल्याणासाठी कटीबद्ध आहे. केंद्र सरकारच्या मदतीने राज्य सरकार या सर्वांसाठी विशेष अर्थसहाय्य योजना राबवत आहे. या विविध योजना राबवताना संबंधित लाभार्थ्यांना सरकारी कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नये, त्यांना मिळणारी रक्कम थेट त्यांच्या हातात मिळावी, यासाठी डी.बी.टी. पोर्टलद्वारे त्यांना त्यांची विशेष सहाय्य मदत त्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येते. या योजनेतून भ्रष्टाचार, दिरंगाई थांबली आहे. समाजातील गरजू, निराधार, निराश्रीत आणि वृद्धांच्या कल्याणासाठी राज्य सरकार नेहमीच कटीबद्ध आहे आणि यापुढेही राहील. समाजातील सर्व गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना या विविध योजनेअंतर्गत आर्थिक मदत मिळावी, यासाठी विशेष सहाय्य विभाग कार्यरत असून सदर योजनेचा प्रसार राज्यभर करण्यात येत आहे तरी सर्व पात्र लाभार्थी यांनी योजनांचा लाभ घ्यावा.



## थोडक्यात...



### विवाहितेचा छळ; पतीसह सहा जणांविरुद्ध गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणून हुंड्याची मागणी करून शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना १६ मार्च २०२३ ते २४ जानेवारी २०२५ दरम्यान सासरी इंडी येथे घडली. याप्रकरणी रजियाबेगम रमजान माशाळकर (वय ३६ रा. गरिबी हटाव झोपडपट्टी, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती रमजान, सासू रहमतबी, सासरे म.हनिफ, दीर सैफुल्ला, दीर सादिक, ननंद महाबुबी (सर्व रा. दर्गा गल्ली, इंडी जिल्हा विजयपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी या सासरी नांदताना यातील आरोपींनी मिळून फिर्यादीस विनाकारण किरकोळ कारणावरून शिवीगाळ व शारीरिक व मानसिक त्रास देत. तसेच माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणून मारहाण केली व फिर्यादीत घरातून हाकलून दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### दुकानाचे शटर उचकटून ऐवज पळविला

सोलापूर, (प्रतिनिधी) : हत्तुर गाव येथील अमोगसिद्ध जनरल स्टोअर्सचे शटर अज्ञात चोरट्याने तोडून दुकानातील विविध कंपनीचे कोल्ड्रिंक्स, पाणी बॉटल, बिस्कीट असा ५५ हजार रुपयांचा ऐवज करून नेल्याची घटना २८ फेब्रुवारीला घडली. याप्रकरणी सर्जेराव बिरप्पा बने (वय-३८, रा.हत्तुर गाव) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### रेल्वे स्टेशन परिसरातून दुचाकी पळविली

सोलापूर, (प्रतिनिधी) : रेल्वे स्टेशन येथील रेल्वे रिझर्वेशन ऑफिसच्या बाजूला असलेल्या पादचारी पुलाखाली लावलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ ए एम २७६१) चोरून नेल्याची घटना १७ फेब्रुवारीला घडली. याप्रकरणी रितेश शिवराज कवटेकर (वय-३९, रा.कोणार्क नगर, विजापूर रोड) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या प्रयत्नांना यश

## आष्टी उपसा सिंचन योजनेतून पहिल्यांदाच मोडनिंब शहराला पाणी मिळाले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांच्याकडे मोडनिंब शहरातील अनेक ग्रामस्थांनी मागणी केली असता केली कित्येक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मोडनिंब शहराला पाणी प्रश्नाला अखेर न्याय मिळाला असल्याने नागरिकामध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे..

मोडनिंब शहर आणि परिसरातील नागरिकांची पाण्यासाठीची प्रतीक्षा अखेर संपली असून आमदार अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने चर्चा आणि पाठपुरावा केल्यानंतर आष्टी उपसा सिंचन योजनेतून डाव्या कालव्यातून पहिल्यांदाच पाणी सोडण्यात आले.





या ऐतिहासिक क्षणी जिल्हा परिषद सदस्य श्री.भारत आबा शिंदे, श्री. आनंद पाटील, डॉ.श्री.सागर गिड्डे, श्री.बाळासाहेब पाटील, श्री.बालाजी पाटील, श्री.शिवाजीराजे सुर्वे, श्री.दिपक सुर्वे, श्री.गौतम ओहोळ, श्री.गोटु शिंदे, श्री.विजयसिंह गिड्डे, श्री.संतोष मुटकुळे, श्री.संभाजी काळे, श्री.अख्तरभाई तांबोळी, श्री.आकाश कोळी, श्री.संभाजी लादे, श्री.नंदकुमार लादे, श्री.प्रकाश कोळी, संचालक श्री.संदीप खारे, श्री.सचिन वाघाटे यांनी जलपूजन करून आनंद व्यक्त करत आमदार पाटील याउअंचे आभार व्यक्त केले.

मोडनिंबसाठी हा विकासाचा महत्त्वाचा टप्पा असून, भविष्यात आणखी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असे देखील आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे.

# पाच वर्षापासुन प्रलंबित निफाड पोलीस स्टेशनचा विषय जिल्हाधिकारी यांचे एका फोन ने लागला मार्गी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : निफाड पोलीस स्टेशन येथील नव्याने बांधण्यात आलेली इमारत सुमारे पाच वर्षापासून धुळखात पडलेली असुन इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे परंतु त्यामध्ये लाईट फिटिंग व प्लंबिंग तसेच कुठल्याही प्रकारचे फर्निचर नसल्याने पोलिसांना नव्या इमारतीमध्ये स्थलांतर करण्यात आले नसून जुन्या इमारती मध्येच काम करावे लागत आहे, या ठिकाणी पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना पुरेशी जागा नसल्याने त्यांना तपासाच्या दृष्टिकोनातून तसेच मुद्देमाल ठेवण्याच्या दृष्टिकोनातून गैरसोयीचे होत होते, मुख्यमंत्री यांच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमानिमित्त निफाड नगरपंचायत येथे भेट दिली असता या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी सर्व बाबी समजून घेतल्या व कोणाच्या काही अडीअडचणी असतील तर ते कळवण्याबाबत सांगितले या प्रसंगी निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी जिल्हाधिकारी जलद शर्मा यांचेकडे व्यथा मांडली असून त्याची दखल घेत जिल्हाधिकारी यांनी तात्काळ त्यांच्या अधिकारी यांच्याशी बोलणी करून निफाड पोलीस स्टेशन चा विषय मार्गी लावण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या वेळी प्रांताधिकारी हेमांगी पाटील, तहसीलदार विशाल नाईकवाडे, निफाड नगरपंचायत चे मुख्याधिकारी अमोल चौधरी, उपनगराध्यक्ष अनिल पा.कुंदे, नगरसेवक नगरपंचायत कर्मचारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते,



# अखेर कल्याण कसारा कर्जत रेल्वे; प्रवासी संघटनेच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

कल्याण लोहमार्गावरील वाढती गुन्हेगारी आणि अपघात सातत्याने वाढत असल्याने आम्ही कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेच्या माध्यमातून मागील आठ वर्षापासून महाराष्ट्र शासन आणि रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिस आयुक्तालयात पाठपुरावा करीत होतो, अखेर आज शासनाने नव्याने आसनगाव आणि अंबरनाथ पोलिस ठाणी निर्माण केल्याचा शासन निर्णय झाल्याने आनंदाचे वातावरण पसरले आहे.

वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण आणि रोजची अपघातांची संख्या यामुळे कल्याण लोहमार्ग पोलिस स्टेशनवर कामाचा फार मोठा ताण पडला होता, बॅग, मौल्यवान वस्तू हरवल्यास त्याची तक्रार नोंदविण्यासाठी दोन दोन दिवस लागत असत. त्यामुळे अनेक तक्रारी प्राप्त होत होत्या. आता ही दोन्ही रेल्वे स्टेशन निर्माण झाल्यास रेल्वे प्रवासी आणि नागरिकांना होणारा मानसिक त्रास कमी होणार आहे.

आसनगाव पोलिस स्टेशन साठी एकूण ५८ तर अंबरनाथ पोलिस स्टेशन साठी एकूण ५१ इतके पोलिस बल मिळणारं असल्याने आता रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे, यावेळी महाराष्ट्र शासन आणि लोहमार्ग पोलिस आयुक्त रविंद्र शिसवे यांचे कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजेश घनघाव यांनी आभार व्यक्त केले आहेत.



# उमरगा येथे लाईनमनदिनानिमित्त सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा प्रतिनिधी/ज्ञानेश्वर गुरव : उमरगा येथील महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात मंगळवारी ( दि.४ मार्च ) रोजी लाईनमन डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

देशभरातील लाईनमन बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केंद्र सरकारने ४ मार्च ला देशभर लाईनमन दिवस साजरा करण्याचे आवाहन केले होते. त्या अनुषंगाने उमरगा उप विभागातील सर्व लाईनमनचा यथोचित सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुळजापूर विभागाचे उपव्यवस्थापक बालाजी दुधभाते, प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक अभियंता बळवंतकर, उमरगा उपकार्यकारी अभियंता सचिन रेकुलवाड, यांची उपस्थिती होती.

महावितरण चा कणा म्हणजे लाईनमन, पावसाची,उन्हाची, दिवस-रात्र न बघता वीज ग्राहकांना अखंड सेवा देणाऱ्या या लाईनमनचा मान्यवरांच्या हस्ते फेटा बांधून, टूलकिट बॅग देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी लाईनमन बिडी पवार, जेके कुंभार, महंमद लदाफ, गोविंद झुरळे, देवा जाधव, नाना राऊत, शंकर चक्रे, श्याम अबाचने, अंजली घोडके, अतिश ठाकूर, अशोक माने, अमोल पाटील, मोहन गुरव, सातप्पा स्वामी, तुकाराम कापसे, जितू दुबे, अनिल कोल्हे, विलास डोंगरे, विश्वजीत कुंभार,सचिन शिंदे, विष्णू जगदाळे, महादेव बनसोडे, दीपक शेम्बडे, रवि कोटरे, नितीन भस्मे, यांच्यासह उमरगा, बलसुर, तुरोरी, माडज,मुरूम येथील सर्व लाइनमन चा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास महावितरणचे उमरगा उपविभागातील सहाय्यक अभियंता औदुंबर मोरे, सचिन वाघमारे, जे एस हिंगमिरे, सतीश सिंदगी, अलीम सय्यद, गणेश शेंबाळे, सहाय्यक लेखापाल मरुफ काझी, लिपिक नवनाथ बडे, अमोल माळी, गगन रणखांब, राजेंद्र जामगे, सुनील खांडेकर यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# संत रविदास जयंती महोत्सव सोहळा व संत रविदास राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाळासाहेब अहिरे/ उल्हासनगर : संत रविदास सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने ठाणे जिल्हा उल्हासनगर येथे संत रविदास महाराज चौकात संत रविदास जयंती महोत्सव सोहळा व संत रविदास राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा दि २८/२/ २०२५ रोजी मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा कॅबिनेट मंत्री सूर्यकांतजी गवळी उल्हासनगर उपमहापौर श्री भगवानजी भालेराव भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष श्री महेशजी सुखारामणी मा उद्योजक तथा समाजसेवक श्री संजयजी गुप्ता यांच्या हस्ते संत गुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण करून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे गुलाबाचे फुल व सन्मानचिन्ह देऊन प्रदेश अध्यक्ष श्री पितांबर शिंदे व महासचिव श्री अशोक वसईकर सर यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.व सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या डॉक्टर वकील शिक्षक समाजसेवक यांना संत रविदास राज्यस्तरीय पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे संयोजक कमलेशजी निकम भरत राजवाणी प्रभू लहाने प्रमेराज नेरकर विद्याताई लोंढे उर्फ विकीगुरु

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री गजानन भाऊ लिंबोरे यांनी प्रास्ताविक केले, संघटनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या कार्याची माहिती देताना याचवेळी आपल्या समाजाला जिथे आपल्या समाजाची २०-३०घरे असतील तिथे समाजमंदिर बांधकाम करुन मिळण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत मात्र आपला समाज पूर्ण ताकदीने त्यासाठी संघटनेच्या पाठिशी उभा राहत नसल्याची खंतही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली आणि आपल्या मागण्यांसाठी एकत्र लढा देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

कार्यक्रमाचे व्यवस्थापक श्री प्रकाश जाधव यांनी भाषणातून आपल्या कार्यकर्तृत्वावर विश्वास ठेवून आपण करीत असलेल्या कामांची लाज न बाळगताआपल्या मनगटावर विश्वास ठेवून कार्यप्रवण राहून यश संपादन करण्यासाठी आपल्या समाजातील संतमहंतांची शिकवण डोळ्यासमोर ठेवून कार्य करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले ,तरच अशा कार्यक्रमांचे आयोजनाचा उद्देश सफल होईल

प्रफुल्ल केदारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले,या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने चर्मकार समाज बांधव व भगीनींनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला,



कार्यक्रमानंतर समस्त समाजबांधवांनी भोजनाचा आस्वाद घेतला,व सोहळा प्रबोधनात्मक महापुरुषांच्या गायनाने साजरा केला.

## एकूण १४७ किलो गांजा जप्त करून ४० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांकडून जप्त

# पंढरपूर तालुका पोलिसांची अवैध गांजाविरुद्ध मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : येथील अहिल्यादेवी चौकात दिनांक पाच मार्च २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे गुरसाळे रोडवर अहिल्यादेवी चौकात मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांना मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे पंढरपूर तालुका पोलिसांनी अहिल्यादेवी चौकात नाकाबंदी करण्यात आली होती सदर नाकाबंदी कारवाईच्या वेळेस गुरसाळे येथून अहिल्यादेवी चौकात एक संशयित महिंद्रा एक्स वि फाईव्ह हंड्रेड कार



जाताना पंढरपूर तालुका पोलिसांनी अडवून संशयित वाहनाची तपासणी केली असता सदर वाहनांमध्ये इसम नामे प्रदीप दत्तात्रय हिवरे (वय २० वर्षे, राहणार- पुरांडवड माळशिरस तालुका, जिल्हा सोलापूर) याच्याकडे विचारपूस केली असता सदर कार मध्ये मधल्या सीटवर पाठीमागच्या सीटवर एकूण तीन पोते गांजा आंबट उग्र वासाचा एकूण ७२ पाकिटामध्ये पॅक करण्यात आला होता सदर गांजा जागीच शासकीय पंचांच्या उपस्थित वजन केला असता एकूण १४७ किलो ग्रॅम वजनाचा गांजा व महिंद्रा ॉ५०० तिचा नंबर ाह १२ एच व्ही ५६ ६६ कार एकूण ४० लाख रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केलेला आहे सदर गाडीतील इसम प्रदीप दत्तात्रय दत्तात्रय हिवरे वय वीस वर्षे राहणार पुरंदावडे माळशिरस याचे व त्याचे तीन साथीदार नामे गणेश हनुमंत पवार गणेश हनुमंत पवार राहणार जिंपुरी तालुका माळशिरस राहणार चिंचपुरी तालुका माळशिरस प्रमोद उर्फ सोनू मुळीक राहणार गुरसाळे तालुका माळशिरस यांच्याविरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे एनडीपीएस छ‍ज्झड ॲक्ट कलम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पंढरपूर तालुका पोलिसांची ही अवैध गांजाविरुद्ध आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई करण्यात आलेली असून एकूण १४७ किलो इतका गांजा व कार असा चाळीस लाखाचा मुद्देमान पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केला आहे.

माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री अतुल कुलकर्णी साहेब, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक साहेब, श्री प्रीतम यावलकर साहेब, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अर्जुन भोसले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक घोडके पीएसआय विक्रम शेठ वडणे, पीएसआय भारत भोसले, पीएसआय घुंगुरकर, पीएसआय पिसाळ, सहाय्यक फौजदार विजू गायकवाड, सहायक फौजदार दत्तात्रय तोंडले, साह फौजदार शरद कदम, पोलीस हवालदार विनायक क्षीरसागर, पोलीस कॉन्स्टेबल अमोल गावडे, सुजित उबाळे, पोलीस हवालदार मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल रामकृष्ण खेडकर साहेब, सह फौजदार शरद कदम, पोलीस हवालदार सूरज हेंबाडे, सचिन हेंबाडे, पोलीस हवालदार प्रसाद आवटी, पोलीस कॉन्स्टेबल समाधान माने, पोलीस कॉन्स्टेबल शहाजी मंडले यांच्या पथकाने केली आहे.